पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – २४

**सभावृत्तांत**

दिनांक - **०२/०९/२०१६** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार, दिनांक **०२/०९/२०१६** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा. ताकवणे नंदा विकास - सभापती**
२. मा. आर.एस.कुमार
३. मा. पांढरकर निलेश शंकरराव
४. मा. भारती फरांदे
५. मा. पाडाळे निता विलास
६. मा. लोखंडे गोरक्ष जाकाराम
७. मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव

याशिवाय मा.डोईफोडे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले -**

विषय क्र.१) कै.नागुभाऊ बारणे पुतळयास मेघडंबरी करणेबाबत **–** मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) अंदाजपत्रकीय रकमेमध्ये सुधारणा करणेबाबत **–** मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) प्रभाग क्र.१९ रावेत येथील म्हस्केवस्ती, लक्ष्मीनगर परिसरातील डी.पी.रस्ते विकसित करणेबाबत **–** मा.भारती फरांदे, मा.गोरक्ष लोखंडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) प्रभाग क्र.१९ वाल्हेकरवाडी मधील शिंदेवस्ती येथील बी.आर.टी.एस. रस्ता ते रेल्वेलाईन पर्यंतचा रस्ता विकसित करणेबाबत – मा.भारती फरांदे, मा.गोरक्ष लोखंडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) कामाचे स्थळ बदल करणेबाबत – मा.नंदा ताकवणे, मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव.

----------

**खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.भारती फरांदे                                        अनुमोदक – मा.निता पाडाळे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समिती सभेची दि.०२/०९/२०१६ ची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०७/०९/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती -** बुधवार दिनांक ०७/०९/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**(नंदा विकास ताकवणे)**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – २४

**सभावृत्तांत**

**(** दिनांक ०२/०९/२०१६ ची तहकूब सभा **)**

दिनांक - **०७/०९/२०१६** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक ०२/०९/२०१६ ची तहकूब सभा बुधवार, दिनांक **०७/०९/२०१६** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा. ताकवणे नंदा विकास - सभापती**
२. मा. आर.एस.कुमार
३. मा. पांढरकर निलेश शंकरराव
४. मा. भारती फरांदे
५. मा. पाडाळे निता विलास
६. मा. लोखंडे गोरक्ष जाकाराम
७. मा. कुटे चारुशिला प्रभाकर

याशिवाय मा.लहारे – प्रशासन अधिकारी, मा.उल्हास जगताप – नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**मा.भारती फरांदे** – मा.विधी समिती सभा (कार्यपत्रिका क्र.२३) दि.१९/०८/२०१६ मध्ये ठराव क्र.९८ विषय क्र.१ मध्ये दि.१८/०८/२०१६ ऐवजी दि.१९/०८/२०१६ अशी दुरुस्ती करुन सभावृत्तांत कायम करणेत यावा

**सभापती -** मा.विधी समिती सभा (कार्यपत्रिका क्र.२३) दि.१९/०८/२०१६ मध्ये ठराव क्र.९८ विषय क्र.१ मध्ये दि.१८/०८/२०१६ ऐवजी दि.१९/०८/२०१६ अशी दुरुस्ती करुन त्या दुरुस्तीसह सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**----------**

**सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक :९९ विषय क्रमांक : १

दिनांक : ०७/०९/२०१६

सुचक - मा.भारती फरांदे अनुमोदक - मा.निलेश पांढरकर

संदर्भ:- मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव -

सद्यस्थितीत थेरगाव प्रभाग क्र.५० मध्ये गावठाण येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळयास मेघडंबरी करणे ( निविदा क्र.४१/०२-२०१५-१६ ) चे काम चालू आहे. प्रभाग क्र.५१ मध्ये नुकताच नागुभाऊ गतीराम बारणे मनपा शाळेत कै.नागुभाऊ गतीराम बारणे यांचा अर्धाकृती पुतळा बसविणेत आला आहे. सदर पुतळयाचे पावित्र्य आणि मांगल्य राखणेसाठी मेघडंबरी करणे आवश्यक आहे. तरी सदर पुतळयासाठी मेघडंबरी करणेसाठी अंदाजे ५ लाख एवढा वाढीव खर्च होणार आहे. तरी थेरगाव प्रभाग क्र.५० मध्ये गावठाण येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळयास मेघडंबरी करणे ( निविदा क्र.४१/०२-२०१५-१६ ) चे कामातून प्रभाग क्र.५१ मध्ये कै.नागुभाऊ गतीराम बारणे पुतळयास मेघडंबरी करणे व त्यासाठी होणारा वाढीव खर्च अंदाजे र.रु.५ लाखास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :१०० विषय क्रमांक : २

दिनांक : ०७/०९/२०१६

सुचक - मा.भारती फरांदे अनुमोदक - मा.निलेश पांढरकर

संदर्भ:- मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव -

खालील कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेमध्ये सुधारणा करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | पान क्र. | अ. क्र. | लेखाशिर्षक | कामाचे नाव | मुळ अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ६५ | ६३ | शाळा मैदान आणि क्रिडा संकुल उभारणे व दुरुस्ती करणे | प्रभाग क्र.१७ मध्ये रेल्वेलाईनच्या कडेची जागा सुशोभिकरण करुन विकसीत करणे. | ४,००,००,००० | ११,००,००,००० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :१०१ विषय क्रमांक : ३

दिनांक : ०७/०९/२०१६

सुचक - मा.भारती फरांदे अनुमोदक - मा.गोरक्ष लोखंडे

संदर्भ:- मा.भारती फरांदे, मा.गोरक्ष लोखंडे यांचा प्रस्ताव –

रावेत येथील म्हस्केवस्ती, लक्ष्मीनगर परिसरातील डी.पी.रस्ते विकसित करणे (नि.क्र. स्था/अ/HO/१८/११/२०१५-१६) या कामातून प्रभाग क्र.१९ मधील इतर रस्त्यांची कामे करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :१०२ विषय क्रमांक : ४

दिनांक : ०७/०९/२०१६

सुचक - मा.भारती फरांदे अनुमोदक - मा.गोरक्ष लोखंडे

संदर्भ:- मा.भारती फरांदे, मा.गोरक्ष लोखंडे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.१९ वाल्हेकरवाडी मधील शिंदेवस्ती येथील बी.आर.टी.एस.रस्ता ते रेल्वे लाईन पर्यंतचा रस्ता विकसित करणे (नि.क्र.५५/१६/२०१५-१६) या कामात शिंदेवस्ती येथील बी.आर.टी.एस.रस्ता ते रेल्वे लाईन पर्यंतचा रस्ता ऐवजी प्रभाग क्र.१९ मधील इतर रस्त्यांची कामे करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :१०३ विषय क्रमांक : ५

दिनांक : ०७/०९/२०१६

सुचक - मा.नंदा ताकवणे अनुमोदक - मा.नीता पाडाळे

संदर्भ:- मा.नंदा ताकवणे, मा.नीता पाडाळे यांचा प्रस्ताव –

निविदा क्र.४७/१५ प्रभाग क्र.२१ मधील एस.के.एफ. जवळच्या नाल्याच्या साईडने प्रस्तावित केलेल्या फुटपाथमुळे एस.के.एफ.कॉलनीतील परिसरात शांतता भंग होईल असे नागरिकांचे म्हणणे असल्याने त्यांनी कामास विरोध केल्यामुळे सदरचे कामात स्थळ बदल करुन उद्योगनगर भागातील फुटपाथ व अनुषंगिक कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(नंदा विकास ताकवणे)**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४७२/२०१६
दिनांक : ०८/०९/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.